# तक्रार युएलपी क्र.१२/२०२६

(CNR No. MHLC080000372026)

**(पुंडलिक शिवाजी केंद्र वि. विभाग नियंत्रक व. इतर)**

**निशाणी यु–२ वरील आदेश**

**दिनांक १०/०८/२०२६.**

१. प्रस्तुतचा अर्ज वाचला. कागदपत्रांची पडताळणी केली. तक्रारदारातर्फे श्री. ए. बी. कांबळे वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

२. तक्रारदारातर्फे असा युक्तीवाद करणेत आला की, सामनेवालातर्फे अधिकाऱ्यांनी सुधारित शिस्त व अपिल कार्यपध्दतीनुसार डेपो व्यवस्थापकाच्या क्षमतेत न येणारी सर्व प्रकरणे विभागीय वाहतुक अधिक्षक (अपराध) यांनी सक्षम प्राधीकारी कडून चौकशी करणे अपेक्षित असताना प्रस्तुत प्रकरणात विनाअधिकार विभागीय वाहतुक अधिकारी यांनी चौकशी केलेली आहे. तक्रारदाराविरुध्द केलेली चौकशी घाईगडबडीने पुर्ण केली असल्यामुळे तसेच नमुद आरोपांसाठी बडतर्फीची शिक्षा नसताना ही ती देऊ केली असल्यामुळे आज रोजी अंतरिम सरंक्षण मिळणे आवश्यक असून ते देण्यात यावे अशी विनंती केली आहे.

३. सामनेवाला यांनी प्रस्तुत प्रकरणात निशाणी सी–१ प्रमाणे दि.०५/०८/२०२६ रोजी कॅव्हेट अर्ज दाखल केला आहे तसेच तक्रारदारांनी निशाणी यु–४ सोबत अनुक्र.१४ कडे सामनेवाला यांना प्रस्तुत तक्रार दाखल करीत असल्याची नोटीस व दिलेल्या कारणा दाखवा नोटीसला खुलासा दिलेला आहे.

४. आज रोजी सामनेवाला तर्फे वकिल पुकारता गैरहजर. परंतु त्यांनी प्रस्तुत प्रकरणात कागदपत्रे दाखल केली आहेत. प्रस्तुत प्रकरणातील परिस्थितीचा विचार करता तसेच तक्रारदाराने घेतलेल्या आक्षेपानुसार त्याच्याविरुध्द करणेत आलेली

चौकशी घाईगडबडीने व विनाअधिकार करणेत आली आहे. वरील कारणांमुळे प्रथमदर्शनी आज रोजी तक्रारदारास अंतरिम संरक्षण देणे आवश्यक आहे. प्रस्तुत अर्जावरील अंतिम निर्णय दोन्ही बाजुंचा गुणदोषावरील युक्तीवाद ऐकुन देता येईल. सबब, उपरोक्त कारणांमुळे मी पुढील आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

१. सामनेवाला क्र.१ व २ यांना महाराष्ट्र कामगार संघटनांना मान्यता आणि अनुचित कामगार प्रथा बंदी कायदा, १९७१ कलम ३०/२ प्रमाणे अशी अंतरिम मनाई करणेत येते की, त्यांनी दि.०४/०८/२०२६ रोजीच्या कारणा दाखवा नोटीस प्रमाणे पुढील तारखेपर्यंत म्हणजेच दि.१८/०८/२०२६ रोजी पर्यंत तक्रारदारविरुध्द कोणतीही कारवाई करु नये.

२. सामनेवालातर्फे आज रोजी प्रस्तुत तक्रार व अर्जाची प्रत स्विकारण्यात आलेली असल्यामुळे स्वतंत्र नोटीस काढण्यात येवू नये.

३. सामनेवाला यांनी प्रस्तुत अर्जावर कोणताही कसून न करता पुढील तारखेस लेखी म्हणणे देण्याचे आहे.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहीर)

**सही/–**

**ठिकाण – रत्नागिरी.** **(सुमित वि. जोशी)**

**दिनांक –१०/०८/२०२६.** **न्यायाधीश, कामगार न्यायालय, रत्नागिरी**